# MAHARASHTRA ACT No. II OF 1980

## THE MAHARASHTRA SINHASTHA FAIR PILGRIM TAX ACT, 1980

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक ९ फेब्रुवारी १९८० रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**एम. ए. धोत्रे,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. II OF 1980

## AN ACT TO PROVIDE FOR LEVY AND COLLECTION OF TAX ON PILGRIMS VISITING TRIMBAK MUNICIPAL AREA DURING THE PERIOD OF SINHASTHA FAIR, 1979-80.

[ राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक १२ फेब्रुवारी १९८० रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला ]

## सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २.

**१९७९–८० मधील सिंहस्थ मेळ्याच्या कालावधीत त्रिंबक नगरपालिका क्षेत्रात येणाऱ्या यात्रेकरूंवर कर बसविण्याची व तो वसूल करण्याची तरतूद करण्याकरता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** २९ ऑगस्ट १९७९ रोजी सुरू होणाऱ्या व २६ सप्टेंबर १९८० रोजी संपणाऱ्या सिंहस्थ मेळ्याच्या कालावधीत, महाराष्ट्र राज्यामधील नाशिक जिल्ह्यातील त्रिंबक नगरपालिका क्षेत्रात असंख्य यात्रेकरू येण्याची शक्यता होती;

**आणि ज्याअर्थी,** राज्य शासन, याप्रसंगी यात्रेकरूंच्या आरोग्याची, स्वच्छतेची, सुरक्षिततेची, सोयींची आणि कल्याणाची अधिक चांगली आणि पुरेशी व्यवस्था करीत आहे;

**आणि ज्याअर्थी,** यासाठी कराव्या लागणाऱ्या जादा खर्चापैकी काही खर्च भागविण्यासाठी, सिंहस्थ मेळ्याच्या कालावधीत त्रिंबक नगरपालिका क्षेत्रात येणाऱ्या यात्रेकरूंवर कर बसविण्याची व तो वसूल करण्याची तरतूद करणे इष्ट होते ;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९७९ **आणि ज्याअर्थी,** उपरोक्त बाबींसाठी व त्यांच्याशी संबंधित बाबींसाठी तरतूद करणारा कायदा
चा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे आवश्यक आहे अशी परिस्थिती
महा. अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री झाली होती; आणि म्हणून त्यांनी, महाराष्ट्र सिंहस्थ मेळा
अध्या. यात्रेकरूंवरील कर अध्यादेश, १९७९ हा, २४ ऑगस्ट १९७९ रोजी प्रस्थापित केला होता ;
६.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे, राज्य विधान मंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** याद्वारे भारतीय गणराज्याच्या एकतिसाव्या वर्षी पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व कालावधी. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सिंहस्थ मेळा यात्रेकरूंवरील कर अधिनियम, १९८० असे म्हणता येईल.

(२) तो, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या त्रिंबक नगरपालिकेच्या हद्दीतील क्षेत्रास व तिच्या परिसरातील पाच किलोमीटरच्या क्षेत्रास लागू असेल. सन १९६५ चा महाराष्ट्र अधि. ४०.

(३) तो २९ ऑगस्ट १९७९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल व २६ सप्टेंबर १९८० पर्यंत तो अंमलात राहील आणि पूर्वोक्त कालावधी संपण्यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या गोष्टींच्याबाबतीत असेल त्याव्यतिरिक्त, तो नंतर अंमलात राहणार नाही.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "प्रौढ" म्हणजे, ज्या व्यक्तीने, वयाची १२ वर्षे पूर्ण केलेली आहेत अशी व्यक्ती ;

(ब) "बालक" म्हणजे ज्या व्यक्तीच्या वयाची बारा वर्षे पूर्ण झालेली नाहीत अशी व्यक्ती ;

(क) "जिल्हाधिकारी" म्हणजे, नाशिक जिल्ह्याचा जिल्हाधिकारी आणि त्यात, या अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याच्या शक्तींचा वापर करण्यासाठी आणि जिल्हाधिकाऱ्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी त्याने प्राधिकृत केलेल्या, तहसीलदाराच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो ;

(ड) "नगरपालिका अधिनियम" म्हणजे, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ ; सन १९६५ चा महाराष्ट्र अधि. ४०.

(इ) "नाका" म्हणजे, या अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेला नाका ;

(फ) "सिंहस्थ मेळ्याचा कालावधी" म्हणजे, २९ ऑगस्ट १९७९ रोजी सुरू होणारा आणि २६ सप्टेंबर १९८० रोजी संपणारा (दोन्ही दिवस धरून) कालावधी ;

(ग) "यात्रेकरू" म्हणजे, ती व्यक्ती सूट देण्यात आलेल्या व्यक्तींपैकी नसेल तर, सिंहस्थ मेळ्याच्या कालावधीत त्रिंबक नगरपालिका क्षेत्रात येणारी कोणतीही व्यक्ती ;

(ह) "यात्रेकरू कर" म्हणजे, या अधिनियमान्वये बसविण्यात व वसूल करण्यात येणारा यात्रेकरूंवरील कर ;

(आय) "त्रिंबक नगरपालिका क्षेत्र" म्हणजे, नगरपालिका अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेल्या त्रिंबक नगरपालिकेच्या अधिकारितेतील क्षेत्र.

सिंहस्थ मेळ्याच्या काळात त्रिंबक नगरपालिका क्षेत्रात येणाऱ्या व्यक्तींवर यात्रेकरू कर बसविणे. ३. (१) नगरपालिका अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, सिंहस्थ मेळ्याच्या कालावधीत त्रिंबक नगरपालिका क्षेत्रात येणाऱ्या किंवा त्रिंबक नगरपालिका क्षेत्रात प्रवेश करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीवर (ती व्यक्ती या अधिनियमान्वये सूट देण्यात आलेली व्यक्ती नसेल तर) प्रत्येक वेळी, पुढील दराने यात्रेकरू कर बसविण्यात व वसूल करण्यात येईल :—

(अ) प्रौढ व्यक्तीला, ती येईल त्या प्रत्येक वेळी किंवा प्रत्येक प्रवेशासाठी, एक रुपया ;

(ब) बालकाला ते येईल त्या प्रत्येक वेळी किंवा प्रत्येक प्रवेशासाठी, पन्नास पैसे ;

(२) उक्त कर, व्यक्ती ज्या वाहनाने प्रवास करत असेल त्या वाहनात किंवा वाहनाजवळ किंवा त्रिंबक नगरपालिका क्षेत्रातील किंवा तिच्या परिसरातील कोणत्याही भागातील कोणत्याही नाक्यावर, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या मालकीच्या कोणत्याही टप्पा वाहनाच्या कंडक्टरला किंवा जिल्हाधिकाऱ्याने नेमलेल्या नाका कारकुनास वसूल करता येईल.

(३) कर देण्यात आल्यावर, कर वसूल करणारी व्यक्ती जिल्हाधिकाऱ्याने ठरवून दिलेल्या नमुन्यातील प्रवेशपत्र किंवा तिकीट त्या व्यक्तीला देईल.

(४) यात्रेकरू कर देण्यास पात्र असलेली कोणतीही व्यक्ती, वर सांगितल्याप्रमाणे कर देऊन प्रवेशपत्र किंवा तिकीट घेतल्याशिवाय, सिंहस्थ मेळ्याच्या कालावधीत, कोणत्याही वेळी, नगरपालिका क्षेत्रामध्ये प्रवेश करणार नाही.

(५) या कलमान्वये देण्यात आलेले कोणतेही प्रवेशपत्र किंवा तिकीट दुसऱ्याच्या नावे करून, देता येणार नाही आणि जिल्हाधिकाऱ्याने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीने, तपासणीसाठी मागणी केली असता, ते सादर करण्यात येईल.

**यात्रेकरू कर बसवण्यापासून सूट.**

४. (१) पुढील वर्गातील व्यक्तींना यात्रेकरूंवरील कर देण्याची सूट देण्यात येईल :—

(अ) नगरपरिषदेच्या किंवा जिल्हाधिकाऱ्याच्या प्राधिकाराद्वारे किंवा तदन्वये दिलेले ओळखपत्र किंवा माफीपत्र धारण करणारे त्रिबक नगरपालिका क्षेत्रातील रहिवासी ;

(ब) संसद सदस्य आणि महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचे सदस्य ;

(क) राज्य शासनाचे केंद्र शासनाचे किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचे कामावर असलेले अधिकारी व कर्मचारी;

(ड) पायी प्रवास करणाऱ्या व्यक्ती ;

(ई) घोड्यावरून किंवा सायकलवरून किंवा बैलगाडीतून प्रवास करणाऱ्या व्यक्ती ;

(फ) त्रिबक नगरपालिका क्षेत्राच्या बाहेरील कोणत्याही ठिकाणी जाण्यासाठी त्रिबक नगरपालिका क्षेत्रामार्गे जाणाऱ्या व्यक्ती ;

(ग) तीन वर्षांपेक्षा कमी वयाची सर्व मुले ;

(ह) लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे असे राज्य शासनाला वाटले तर राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे ज्यांना सूट देईल अशा व्यक्तींचा इतर कोणताही वर्ग किंवा कोणतेही वर्ग.

(२) कोणत्याही व्यक्तीला या कलमान्वये कर देण्यात सूट देण्यात आली आहे किंवा कसे असा प्रश्न उद्‌भवला तर तो प्रश्न त्रिबक नगरपालिका क्षेत्रात महसुली अधिकारिता असणाऱ्या तहसीलदाराकडे निर्णयासाठी सोपवण्यात येईल, आणि तहसीलदाराचा निर्णय अंतिम असेल, मात्र त्यावर त्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

**मार्गांचे नियमन आणि कर वसुलीची व्यवस्था.**

५. (१) जिल्हाधिकारी, वेळोवेळी आदेशाद्वारे, त्रिबक नगरपालिका क्षेत्रात प्रवेश करण्याचा उद्देश असलेल्या किंवा प्रवेश करणाऱ्या व्यक्ती कोणत्या मार्गाने आणि कोणत्या वेळेपर्यंत जातील याबाबतचे निदेश देईल आणि पायी, सायकलीने, घोड्यावरून, किंवा बलगाडीने किंवा मोटार गाडीने किंवा इतर वाहनाने येणाऱ्या व्यक्तींसाठी वेगवेगळे मार्ग विनिर्दिष्ट करता येतील.

(२) त्रिबक नगरपालिका क्षेत्रात किंवा त्याच्या परिसरातील कोणत्याही क्षेत्रात येणारी किंवा प्रवेश करणारी कोणतीही व्यक्ती आणि अशा कोणत्याही क्षेत्रात प्रवेश करणारे वाहन ताब्यात असलेली कोणतीही व्यक्ती सिंहस्थ मेळ्याच्या कालावधीत कोणत्याही वेळी, जिल्हाधिकाऱ्याने पोट-कलम (१) अन्वये याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या मार्गाखेरीज अन्य कोणत्याही मार्गाने प्रवेश करणार नाही.

(३) उपरोक्त मार्गावर, जिल्हाधिकारी त्याला आवश्यक वाटतील इतकी नाकी स्थापन करील ; त्या नाक्यांवर त्याने नियुक्त केलेले नाके कारकून काम करतील आणि जिल्हाधिकारी, आदेशाद्वारे अशी नाकी ज्या मार्गावर स्थापन करण्यात आली असतील त्या मार्गाने येणाऱ्या सर्व व्यक्ती, नाके कारकुनांना यात्रेकरू कर वसुल करता यावा म्हणून त्या ठिकाणी थांबतील व असल्यास, आपली वाहने व प्राणी तेथे थांबतील, असा निदेश देईल.

(४) अशा मार्गावर आणि नाक्यांवर, जिल्हाधिकाऱ्यांनी प्राधिकृत केले असतील असे राज्य शासनाचे अधिकारी आणि कर्मचारी गस्त घालतील आणि ते याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या मार्गाखेरीज इतर कोणत्याही मार्गांनी कोणत्याही व्यक्तीला त्रिंबक नगरपालिका क्षेत्रात किंवा तिच्या परिसरात प्रवेश करण्यास परवानगी देणार नाहीत.

(५) जिल्हाधिकाऱ्याने या कलमान्वये काढलेला प्रत्येक आदेश त्रिंबक नगरपालिका क्षेत्रामध्ये प्रसृत होणाऱ्या किमान दोन वर्तमानपत्रांत आणि या कलमान्वये स्थापन करण्यात आलेल्या नाक्याजवळ ठळक जागी त्याची प्रत चिकटवून, प्रसिद्ध करण्यात येईल.

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडे यात्रेकरू कर वसुलीचे काम सोपविणे.**

६. (१) राज्य शासनास, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसने (स्टेज कॅरेज) त्रिंबक नगरपालिका क्षेत्रामध्ये प्रवास करणाऱ्या उतारूंकडून यात्रेकरू कर वसूल करण्याचे काम, राज्य शासन आणि उक्त महामंडळ यांच्यामध्ये संमत होतील अशा शर्तीस अधीन राहून, महामंडळाकड सोपवता येईल.

(२) यात्रेकरू कर वसूल करण्याचे काम उक्त महामंडळाकडे सोपवण्यात आल्यानंतर, उक्त महामंडळाच्या कोणत्याही कंडक्टरला, आणि त्याने (महामंडळाने) याबाबतीत प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीला प्रवासाच्या कोणत्याही सोयीस्कर टप्प्यात कर वसूल करण्याचा आणि प्रवेशपत्र किंवा तिकीट देण्याचा अधिकार असेल.

(३) उक्त महामंडळाच्या बसने त्रिंबक नगरपालिका क्षेत्रामध्ये प्रवास करणाऱ्या प्रत्येक उतारूने (या अधिनियमान्वये त्यास सूट देण्यात आली नसेल तर) कंडक्टरला किंवा इतर प्राधिकृत व्यक्तीला यात्रेकरू कर देणे आणि त्यांच्याकडून प्रवेशपत्र किंवा तिकीट घेणे हे त्याचे कर्तव्य असेल.

**अपराधाबद्दल शिक्षा.**

७. जो कोणी कलम ३, पोट-कलमे (४) किंवा (५) च्या किंवा कलम ५, पोट-कलम (२) किंवा (३) च्या उपबंधाचे हेतूपूर्वक उल्लंघन करील, किंवा राज्य शासनाचा किंवा महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी या अधिनियमाखालील त्याच्या अधिकारांचा वापर करीत असताना किंवा त्याच्या कर्तव्याचे पालन करीत असताना त्याच्या कामात अडथळे आणील तर त्याला, दोषसिद्धीनंतर, शंभर रुपयांपर्यन्त असू शकेल इतकी दंडाची शिक्षा होईल.

**विवक्षित व्यक्ती लोकसेवक असणे.**

८. या अधिनियमान्वये नियुक्त किंवा प्राधिकृत करण्यात आलेली, किंवा या अधिनियमान्वये प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकारास किंवा लादण्यात आलेल्या कोणत्याही कर्तव्यास अनुसरून काम करणारी किंवा काम करण्याचे अभिप्रेत असलेली कोणतीही व्यक्ती, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार, लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल. १८६० चा अधिनियम ४५.

**(कराचे) उत्पन्न राज्याच्या एकत्रित निधीमध्ये जमा करणे.**

९. या अधिनियमान्वये बसवण्यात आणि वसूल करण्यात आलेल्या यात्रेकरू कराचे उत्पन्न राज्याच्या एकत्रित निधीत जमा करण्यात येईल.

**नियम करण्याची शक्ती.**

१०. (१) राज्य शासनाला शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील आणि अशा नियमांमध्ये विहित करण्यात येईल अशा परिस्थितीत आणि अशा शर्तीस अधीन राहून, देण्यात आलेल्या यात्रेकरू कराच्या संपूर्ण रकमेचा किंवा तिच्या भागाचा, कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला परतावा देण्याबाबतची तरतूद असणाऱ्या नियमांचा समावेश करता येईल.

(२) या नियमान्वये करण्यात आलेले सर्व नियम, ते प्रथम करण्यात येतील त्या व्यतिरिक्त, पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील.

(३) ह्या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य, विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील व असा निर्णय शासकीय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेचा तारखेपासून, यथास्थिती, असा फेरबदल केलेल्या स्वरुपातच नियम अंमलात येतील किंवा येणार नाहीत. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीची विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

सन १९७९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. ६.

११. (१) महाराष्ट्र सिंहस्थ मेळा यात्रेकरूंवरील कर अध्यादेश, १९७९ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. सन १९७९ चा महाराष्ट्र अध्यादेश ६ चे निरसन व व्यावृत्ती.

(२) असे निरसन करण्यात आले असले तरीही, अशा रीतीने निरसन करण्यात आलेल्या उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कोणतीही कार्यवाही (कोणतीही नेमणूक, सोपवणूक किंवा प्राधिकार देणे किंवा काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यासह) ही या अधिनियमाच्या संबंधित उपबंधांन्वये करण्यात आलेली आहे असे मानण्यात येईल.

(यथार्थ अनुवाद)

य. शं. कालिटकर,
भाषा संचालक व पदसिद्ध उप सचिव,
सामान्य प्रशासन विभाग.